'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Vol. 8, Issue 4 : Multidisciplinary Issue
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
Oct-Dec 2021

# 'महाराष्ट्राची परंपरा' : एक वाङ्मयीन मूल्यमापन

- डॉ. राजेश्वर दुडूकनाळे
(सहा. प्राध्यापक, मराठी विभाग देगलूर महाविद्यालय, देगलूर)

आधुनिक काळामध्ये महात्मा जोतीराव फुले यांनी छत्रपती शिवाजी महाराजांवर पोवाडा रचून त्यांचा 'कुळवाडी भूषण' असा गौरव केला आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे 'गोब्राह्मण प्रतिपालक' नव्हते तर ते कुळवाडी भूषण होते, ते 'पेशव्यांचे मुख्य धनी' होते हे या पोवाड्यातून त्यांनी दाखवून दिले. परंपरावाद्यांनी शिवरायांची निर्माण केलेली 'गोब्राह्मण प्रतिपालक' ही प्रतिमा कशी खोटी आणि निराधार आहे, हेही यावरून समजते. फुलेंचा हा पोवाडा म्हणजे आधुनिक काळातील पुरोगामी शाहिरी परंपरेची सुरुवात होय. हीच परंपरा पुढे नेण्याचे कार्य अण्णा भाऊ साठे यांच्या शाहिरी कवितेने केले आहे. अण्णा भाऊ साठे प्रथम शाहीर आहेत. नंतर कथा-कादंबरीकार आहेत. त्यांनी प्रथम शाहिरी कविता रचून मराठी साहित्यामध्ये प्रवेश केला. १९४० नंतर त्यांनी लावण्या, पोवाडे, क्रांतिगीते रचायला सुरुवात केली. या रचना तत्कालीन कामगार वर्गात खूप लोकप्रिय झाल्या. अल्पावधीतच त्यांना 'लोकशाहीर' म्हणून मान्यता मिळाली.

'महाराष्ट्राची परंपरा' हा अण्णा भाऊंचा पोवाडा म्हणजे मराठी माणसाचा इतिहास आणि भूगोल आहे. महाराष्ट्राचे वर्तमान आणि भविष्यही आहे. महाराष्ट्राचे एक सुंदर संघर्ष गीत म्हणून या रचनेकडे पाहता येते. हा पोवाडा म्हणजे अण्णा भाऊंच्या प्रतिभेचा सुंदर असा आविष्कार आहे. आशय आणि रचना या दोन्ही दृष्टीने हा पोवाडा सरस आहे. महाराष्ट्राच्या हृदयातले कारुण्य आणि मस्तकातला शूरपणा घेऊन येणारा हा पोवाडा आहे. संत ज्ञानेश्वरांपासून ते संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळी पर्यंतचा संघर्षमय इतिहास या पोवाड्यात आला आहे. प्रारंभी मराठी मातीच्या, निसर्गाच्या सौंदर्याचा गौरव करून अण्णा भाऊ महाराष्ट्राचा विद्रोही इतिहास क्रमशः मांडतात. या विद्रोहातून नवा महाराष्ट्र अस्तित्वात आला आहे, असे अण्णाभाऊंना वाटते.

भारतामध्ये आजही मोठ्या प्रमाणात सामाजिक विषमता आढळून येते. या सामाजिक विषमतेचे मूळ वैदिकांनी निर्माण केलेल्या वर्णव्यवस्थेमध्ये आहे. वेद, पुराण, मनुस्मृती अशा धर्मग्रंथातून हे विषमतेचे बी समाजात पेरल्या गेले. बहुसंख्य लोकांना त्यांच्या न्याय हक्क-अधिकारापासून वंचित ठेवण्यात आले. शूद्र आणि अस्पृश्य लेखून त्यांचे शोषण करण्यात आले. वेद वाचायचे नाहीत, ज्ञान संपादन करायचे नाही असे कायदे करण्यात आले. परिणामी बहुजन समाज अज्ञानाच्या आणि दारिद्र्याच्या अंधकारात खितपत पडला. अशा शोषित समाजाला तेराव्या शतकात ज्ञानाचा मार्ग दाखविण्याचे काम संत ज्ञानेश्वरांनी केले, असे अण्णाभाऊंना वाटते. बहुजन समाजाला समजू नये म्हणून वैदिकांनी संस्कृत भाषेत ज्ञान दडवून ठेवले. हे ज्ञान संत ज्ञानेश्वरांनी मराठीत आणून क्रांती केली, असे कवीचे मत आहे. संस्कृत भाषेत ज्ञान लपवून ठेवून आणि मराठीला कमी लेखून प्रस्थापितांनी बहुजनांचे शोषण केले. म्हणून अण्णा भाऊ म्हणतात,

**"आम्हांला चीड दास्याची | जुलमी सत्तेची | परचक्राची |**
**इतिहास साक्ष देत याला | करूनि आम्ही जबरदस्त हल्ला |**
**अन्यायाचा कडेलोट केला || जी ||**
**संस्कृत भाषेचे मानी | विद्येचे धनी | एकदां त्यांनी |**
**एक अन्याय केला अति घोर | मराठी असुन आमुची थोर |**
**दडपुन केले तिला कमजोर || जी ||"१**

कोणत्याही प्रकारची गुलामी किंवा दास्यत्व आम्हाला मान्य नाही. गुलामीची आम्हाला प्रचंड चीड आहे. या गुलामीच्या विरोधात महाराष्ट्राने अनेकवेळा लढा दिला आहे. इतिहास याला साक्षी आहे. तरीही संस्कृत



238

'RESEARCH JOURNEY' *International E- Research Journal*
Vol. 8, Issue 4 : Multidisciplinary Issue
**Peer Reviewed Journal**
E-ISSN : 2348-7143
Oct-Dec 2021

भाषेचा आधार घेऊन गुलामी लादण्यात आली. खरे तर भाषा हे प्रगतीचे एक उत्तम साधन आहे. मानव जातीच्या प्रगतीमध्ये भाषेचे मोलाचे योगदान आहे. प्रस्थापित व्यवस्थेने मात्र भाषा हे साधनच गुलामी लादण्याचे हत्यार म्हणून वापरले. या समाजघातकी प्रवृत्तीवर प्रहार करताना अण्णा भाऊ लिहितात,

**"ज्ञानाच्या मक्तेदारांनी कट पहा केला ||**
**ती ठेकेदारी तगवून पुढे नेण्याला ||**
**मानून हीन मराठीला | संस्कृतचा पगडा बसविला |**
**प्रगतिचा मार्ग रोखिला | महाराष्ट्र दीन जाहला |**
**अंतरला मायबोलिला | इतिहास, पुराणें, वेद दिसेना त्याला |"[२]**

या जातीयवादी लोकांच्या मक्तेदारीला सुरुंग लावण्याचे काम भगवत गीता मराठीत आणून संत ज्ञानेश्वरांनी केले, असे अण्णा भाऊ म्हणतात. संत एकनाथ, संत जनाबाई, संत तुकाराम आणि रामदासांचा उल्लेखही अण्णाभाऊंनी या पोवाड्यात केला आहे. त्यांच्या मते महाराष्ट्रातील ज्ञानाची परंपरा या संतांनी पुढे नेली. संत ज्ञानेश्वर, एकनाथ आणि रामदासांच्या साहित्यामध्ये अनेक ठिकाणी वर्णव्यवस्थेचे समर्थन दिसून येते. ज्या वर्णव्यवस्थेमुळे बहुसंख्य लोक उपेक्षित राहिले. समतेचा पुरस्कार करणाऱ्या अण्णाभाऊंची ही भूमिका विसंगत वाटत असली तरी, मराठी माणसाबद्दल त्यांच्या मनात खूप प्रेम, जिव्हाळा आहे. हे प्रेमच अशा रचनेतून व्यक्त झाले आहे.

पुढे छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांच्या मावळ्यांनी स्वराज्यासाठी कसा संघर्ष केला, आणि त्यात त्यांना कसे यश आले याचे वर्णन अण्णाभाऊंनी केले आहे. शिवाजी महाराजांनी निर्माण केलेले रयतेचे राज्य म्हणजे महाराष्ट्राच्या इतिहासातील विद्रोही परंपरेचा एक आदर्शच होय. या परंपरेचा गौरव करताना ते म्हणतात,

**"मेघापरी हांक देते झाले शिवाजी | मग उठे तानाजी |**
**बहिर्जी नि येसाजी | हंबिरराव आणि बाजी |**
**मालुसरे आले सूर्याजी | हो मावळे मर्द रणगाजी ||"[३]**

मावळ्यांनी अन्याय, अत्याचाराच्या विरुद्ध कसे बंड पुकारले आणि औरंगजेब, दिलेरखान, शाहिस्तेखान कसा नमविला हे अण्णा भाऊ अत्यंत ओजस्वी भाषेत कथन करतात. मर्द मावळ्यांनी जीवाची बाजी लावून स्वराज्य मिळविले.

कान्होजी आंग्रे हा शूर वीर इंग्रजांच्या विरोधात मोठ्या धाडसाने लढला. इंग्रजांनी महाराष्ट्रावर हल्ला केल्यानंतर कान्होजी आणि त्याच्या शूर साथीदारांनी रणांगण गाजविले. इंग्रजांचे आक्रमण परतून लावले. १७२७ मध्ये झालेल्या या युद्धाचे वर्णन करताना अण्णा भाऊ लिहितात,

**"चाहूल तोफखान्याला त्याची लागली ||**
**गडगड गडाट गडावर तोफ धनगर्जली ||**
**सतराशे सत्तावीस साली | सागराची झोप उडाली ||**
**तांडेल, भंडारी, कोळी | आंग्र्यांची आरमारी शक्ती रणी उतरली ||**
**चौफेर धांवू लागली | इंग्रजी आरमारां तुडवित पायाखाली ||**
**सागरी झुंज सुरू झाली | मराठ्यांनी झेप घेतली ||**
**जोराची धडक मारिली | इंग्रजांची 'डर्बी' नौका पालथी केली ||"[४]**

या युद्धात शेवटी मराठ्यांचा विजय झाला. हा विजय महाराष्ट्राची मान उंचावणारा आहे. म्हणूनच या सर्व शूर वीरांबद्दल अण्णाभाऊंच्या मनात अभिमान आहे. हा अभिमानच या पोवाड्यातून शब्दरूप घेवून येतो.



२३९

E-ISSN : 2348-7143
Oct-Dec 2021

पोवाड्याच्या चौथ्या चौकामध्ये नंतरच्या काळात इंग्रजांविरुद्ध भारतीयांनी कसा संघर्ष केला याचे वर्णन येते. तात्या टोपे, राणी लक्ष्मीबाई, उमाजी नाईक, मांग रामोशी, वासुदेव फडके, बाळ गंगाधर टिळक, क्रांतिसिंह नाना पाटील यांनी इंग्रजांच्या साम्राज्याविरुद्ध केलेले बंड अण्णाभाऊंनी शब्दबद्ध केले आहे. पारतंत्र्याविरुद्ध लढणाऱ्या शूर वीरांचा गौरव करतानाच महात्मा जोतीराव फुले यांच्या क्रांतिकारी सामाजिक कार्याचा उल्लेखही ते करतात. **"महात्मा फुले लाभले महाराष्ट्राला ॥**

**अन्याय निवारुनि न्याय द्याया दलिताला ॥"५**

आधुनिक भारतातील सामाजिक अन्यायाच्या, शोषणाच्या विरोधात बंड पुकारणारे क्रांतिकारी महापुरुष म्हणून महात्मा फुले ओळखले जातात. त्यांनी उभारलेल्या शोषण मुक्तीच्या लढ्याबद्दल अण्णा भाऊ साठे यांना नितांत आदर होता. याची साक्ष म्हणजे वरील काव्यपंक्ती होत.

साताऱ्याच्या भूमीमध्ये प्रतिसरकार निर्माण करून इंग्रजांच्या विरोधात बंड करणारे क्रांतिसिंह नाना पाटील यांचाही गौरव या पोवाड्यात आला आहे. गुलामीच्या विरोधातले कोणतेही बंड अण्णाभाऊंच्या दृष्टीने गौरवपात्र आहे. म्हणूनच नाना पाटील यांचे प्रतिसरकार पोवाड्याचा विषय बनते.

पोवाड्याच्या पाचव्या चौकामध्ये १९४६ मध्ये मुंबई बंदरावर इंग्रज आणि खलाशी यांच्यात झालेल्या संघर्षाचे चित्रण आले आहे. दुसरे महायुद्ध संपल्यानंतर खलाशी परत मुंबई बंदरावर दाखल झाले. परंतु इंग्रजांकडून त्यांना त्रास सुरू झाला. या खलाशांना इंग्रजांकडून पशुतुल्य वागणूक दिली जात होती. या खलाशांच्या छळाचे वर्णन करताना अण्णा भाऊ म्हणतात,

**"त्या वेळी इंग्रज होते | जेते रणकर्ते | मग कोण पुसते |**

**हिंदी खलाशांचा काय बडिवार | 'सुवर' म्हणुनिया होत सत्कार |**

**आणि कमरेत लाथेचा मार ॥ जी ॥"६**

या जुलमी इंग्रजी साम्राज्याच्या विरोधात सगळा खलाशी एक झाला. त्याने संप पुकारला. त्यामुळे इंग्रज आणि खलाशी यांच्यात संघर्ष सुरू झाला. या संघर्षात मुंबईतील कामगारांनी सहभाग घेतला. खलाशांची बाजू घेत संप पुकारला. कामगारांच्या या संपामुळे इंग्रज सरकार अडचणीत आले. कामगारांच्या या संघर्षाचे वर्णन अण्णा भाऊ पुढीलप्रमाणे करतात. **"ती हांक ऐकता कामगार मग उठला ॥**

**खलाशांना सहाय्य करण्याला |**

**संपाचा घण मग त्याने हाती घेतला ॥**

**हादरले वायुमंडळ असा गर्जला ॥"७**

खलाशी आणि कामगार यांनी मिळून जुलमी सत्तेच्या विरुद्ध बंड पुकारले. या बंडखोरीमुळे इंग्रजांचे साम्राज्य अडचणीत येऊ लागले. हा सर्व संघर्ष अण्णाभाऊंच्या दृष्टीने शोषण मुक्तीसाठी चाललेला आहे.

पोवाड्याच्या शेवटच्या म्हणजे सहाव्या चौकात अण्णाभाऊंनी महाराष्ट्राच्या उन्नतीसाठी सर्वांनी एकत्र येऊन संघर्ष करण्याचे आवाहन केले आहे. बुद्धिवादी, शेतकरी, जहाल या सर्वांनी एकत्र आले पाहिजे, असे अण्णाभाऊंना वाटते. महाराष्ट्राने अंधकारातून, गुलामीतून बाहेर पडण्यासाठी निद्रा झुगारून लढा उभारला पाहिजे. म्हणून ते म्हणतात, **"बा महाराष्ट्रा हो जागा झुगारुन निद्रा |**

**महाविदर्भ गोवा, मराठवाडा सारा |**

**सांधुनी देश हा तीन कोटिचा प्यारा |**

**ने पुढे थोर परंपरा | म्हणे अण्णा साठे घे मुजरा |**

**धीराच्या धिरा | मराठी शाहीरांच्या शाहीरा ॥ जी ॥"८**

एका अर्थाने हा पोवाडा महाराष्ट्राचा इतिहास आहे, भूगोल आहे; महाराष्ट्राचे वर्तमान आणि भविष्यही आहे. महाराष्ट्राचे एक उत्तम संघर्ष गीत म्हणून या रचनेकडे पाहता येते. महाराष्ट्रातील कामगार जगताला जागृत



240

E-ISSN : 2348-7143
Oct-Dec 2021

कष्टेल संघटित करण्याचे काम अण्णाभाऊंच्या या पोवाड्याने केले आहे. डॉ. बाबुराव गुरव यांनी या पोवाड्याच्या संदर्भातले प्र. के. अत्रे यांचे साप्ताहिक 'नवयुग' मधील मत नोंदवले आहे. ते म्हणतात, "आचार्य अत्रे यांच्या साप्ताहिक 'नवयुग'ने या पोवाड्याचा गौरव करताना म्हटले आहे, 'महाराष्ट्राची बंडखोर परंपरा गाणाऱ्या या पोवाड्यात ताजा रसरशीत इतिहास आहे. इतिहासाकडे पाहाण्याची नवी दृष्टी आहे. पण वाखाणण्यासारखी गोष्ट म्हणजे त्यात कोणत्याही उच्च प्रकारच्या काव्याला भूषविणारे सर्व गुण आहेत. त्यात कलेची सफाई आहे. महाराष्ट्राचे वास्तव दर्शन आहे. ते दर्शन देण्याला योग्य असे शब्दही आहेत. "महाराष्ट्राची परंपरा ती पुढती नेण्याला" हे पालुपद प्रत्येक ठिकाणी इतक्या योग्य रीतीने घालण्यात आलेले आहे की ते चटकन हृदयाला जाऊन भिडते. या परंपरेकरिता आपलाही वाटा आपण उचलला पाहिजे असे वाटल्यावाचून राहात नाही."[९] मुळातच अण्णा भाऊ साठे यांचे मराठी माणसावर आणि महाराष्ट्रातल्या मातीवर उत्कट प्रेम आहे. या पोवाड्याचा विषयच मुळात मराठी माणूस आणि त्याची अस्मिता असल्यामुळे तो इतर पोवाड्याच्या तुलनेत सरस झाला आहे. थोडक्यात, अण्णाभाऊंनी सांगितलेली ही 'महाराष्ट्राची परंपरा' काव्यात्मक उंची गाठणारी आहे. म्हणून नारायण सुर्वे म्हणतात, "संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत अण्णाभाऊंच्या प्रतिभेला गरुडाची भरारी आली. शाहिरीचे पंख वेगाने तळपू लागले. महाराष्ट्राची परंपरा, हा त्यांचा पोवाडा म्हणजे माझ्या मते या शतकातला एक अद्भूत प्रतिभा विलास आहे."[१०]

महाराष्ट्राची ऐतिहासिक, भौगोलिक, सांस्कृतिक, राजकीय, भाषिक, साहित्यिक, सामाजिक, पुरोगामी-क्रांतिकारी परंपरा जनतेसमोर मांडण्याचा प्रयत्न अण्णाभाऊंनी या पोवाड्यातून केला आहे. त्यासाठी विविध संतांचा, महापुरुषांचा आणि क्रांतिकारकांचा गौरवपूर्ण उल्लेखही त्यांनी केला आहे. संत, कवी म्हणून ज्ञानेश्वर, एकनाथ, जनाबाई, तुकाराम आणि रामदासांचाही उल्लेख ते करतात. राजकीय क्षेत्रातील क्रांतिकारक म्हणून छत्रपती शिवाजी, कान्होजी आंग्रे, उमाजी नाईक, तात्या टोपे, टिळक, वासुदेव फडके, क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या कार्याचा गौरव त्यांनी केला आहे. सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी या महाराष्ट्रात अनेक महापुरुषांनी बंड पुकारले. त्यात महात्मा फुले यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. अण्णाभाऊंनी फुल्यांच्या कार्याचा गौरव करून पोवाड्याला एक वैचारिक उंची प्राप्त करून दिली आहे. फुल्यांची ही वैचारिक, बंडखोर, विद्रोही परंपरा पुढे राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी चालविली. त्यामुळे प्रस्तुत पोवाड्यात अण्णाभाऊंनी त्यांच्या कार्याचा गौरव केला असता तर पोवाड्यात महाराष्ट्राच्या विद्रोही, वैचारिक परंपरेला पूर्णत्व आले असते, असे वाटत राहते. शेवटी कवितेत काय असावे आणि काय नसावे हा कलावंताच्या स्वातंत्र्याचा प्रश्न असतो. त्याचबरोबर काळाच्याही काही मर्यादा असू शकतात.

पारंपरिक इतिहासाचा आणि पुराणांचा प्रभाव अण्णाभाऊंच्या साहित्यात अधूनमधून डोकावतो. प्रस्तुत पोवाड्यात प्रारंभी महाराष्ट्रातील निसर्ग सौंदर्याचे वर्णन करताना "सह्याद्रि पसरला जिथें शेषासमगिरी" असे ते लिहून जातात. हा परंपरागत विचारांचा प्रभावच म्हणायला हवा.

अण्णा भाऊ साठे यांची शाहिरी कविता महात्मा फुलेंपासून चालत आलेल्या बंडखोर, विद्रोही, परिवर्तननिष्ठ, पुरोगामी शाहिरी परंपरेला बळकटी आणणारी आहे. मार्क्सवादी शाहिरी प्रवाहाला कलात्मक उंची प्रदान करणारी आहे. ही शाहिरी कविता म्हणजे कामगारांचा, कष्टकऱ्यांचा बुलंद आवाज आहे. समतेचा, स्वातंत्र्याचा, क्रांतीचा जयघोष आहे. यामुळेच अण्णाभाऊंचे शाहिरी काव्य परंपरागत शाहिरी काव्यापेक्षा नावीन्यपूर्ण ठरते.

**संदर्भ सूची :**

१. साठे अण्णा भाऊ : शाहीर, मनोविकास प्रकाशन मुंबई, दु. आ. १९८५ पृ. १९
२. तत्रैव, पृ. १९-२०.
३. तत्रैव, पृ. २२.



२४१

E-ISSN : 2348-7143
Oct-Dec 2021

४. तत्रैव, पृ. २४.
५. तत्रैव, पृ. २७.
६. तत्रैव, पृ. २८.
७. तत्रैव, पृ. ३१.
८. तत्रैव, पृ. ३३.
९. गुरव बाबुराव : अण्णा भाऊ साठे - समाजविचार आणि साहित्यविवेचन, लोकवाङ्मय गृह मुंबई, दु. आ. १९९९, पृ. १११.
१०. कुंभार नागोराव (सं.) : शाहीर अण्णा भाऊ साठे, प्रबोधन प्रकाशन लातूर, प. आ. १९९३, पृ. ७४.

**Principal**
A.V.Education Society
Degloor College Degloor



242